जिल्हा परिषद, नंदुरबार
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी कार्यालय,
पशुसंवर्धन विभाग, दुसरा मजला, मुख्य प्रशासकीय ईमारत,
टोकरतलाव रोड, नंदुरबार - ४२५४१२ (महाराष्ट्र)
दुरध्वनी - ०२५६४ -२१०२३६
E-mail ID - dahonandurbar@gmail.com

---

**जा.क्र:जिपनं/पसं/आस्था-२/बदली/१७२/२०२२** **नंदुरबार दिनांक- १८/०४/२०२२.**

**अतिमहत्वाचे**

**ज्ञापन**

महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्रं.जिपब४१४/ प्र.क्रं.११२/आस्था१४ मुंबई दिनांक- १५ मे २०१४ मधील मार्गदर्शक सुचनांन्वये वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्यांची कार्यवाही पूर्ण करणेबाबत सुचीत केले आहे.तसेच शासन निर्णय दिनांक १५ मे २०१४ नुसार जिल्हास्तर व तालुकास्तरावरील बदल्यांचे वास्तव्य जेष्ठता यादी प्रसिद्ध करणेसाठी वेळापत्रक निश्चीत करण्यांत आले आहे.

सर्वसाधारण बदल्या २०२२ साठी पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबार अंतर्गत गट स्तरावर कार्यरत सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक, व्रणोपचारक संवर्गातील वर्ग-४ संवर्गातील कर्मचा-यांची गट प्रमुखांकडुन प्राप्त माहिती नुसार **प्रशासकिय बदलीसाठी तात्पुरती (अंतरिम)** वास्तव सेवाजेष्ठता यादी यान्वये प्रसिध्द करणेत येत आहे.

सदर यादी **www.zpndbr.in** या संकेतस्थळावरील देखील उपलब्ध करण्यांत आली असून याबाबत नोटीस बोर्डावर सूचना लिहून सर्व संबंधितांना याबाबत अवगत करण्यांत यावे.

सदर वास्तव्य सेवा जेष्ठता यांदी प्रत्येक कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून देवून याबाबत काही हरकती, दुरस्ती असल्यास विहीत वेळापत्रकानुसार सदर हरकत लेखी स्वरुपात योग्य त्या पुराव्यासह कागदपत्रासह कार्यालय प्रमुखांचे स्पष्ट अभिप्रायासह **दि.१८/०४/२०२२ ते दि. २७/०४/२०२२** या कालावधीत पशुसंवर्धन विभागांत सादर कराव्यांत. विहीत मुदतीनंतर प्राप्त हरकतींचा विचार केला जाणार नाही. तसेच सदर वास्तव सेवा जेष्ठता यादीतील आपल्या अधिनस्त कार्यरत कर्मचा-यांची माहिती संबधीतांच्या मुळ सेवा पुस्तकावरुन फेर पडताळणी करण्यांत यावी व काही बदल अथवा दुरुस्ती असल्यांस विहीत वेळेत या कार्यालयांस अवगत करावे. आपल्या अधिनस्त कार्यरत वरील संवर्गाच्या सर्व कर्मचा-यांच्या वास्तव सेवा जेष्ठता यादीत समावेश असल्याची खात्री करावी जर एखाद्या बदलीपात्र कर्मचा-यांचे नाव सदर यादीत समाविष्ठ नसल्यांस सदर बाब तात्काळ या कार्यालयाच्या निदर्शनास आणुन देण्यांत यावी. तसेच जे बदलीपात्र कर्मचारी प्राधान्यक्रमानुसार उदा. पती पत्नी एकत्रीकरण, अपंग, विधवा, परितक्त्या, ५३ वर्षावरील कर्मचारी इ. लाभासाठी पात्र ठरत असतील अशा कर्मचा-यांचे आवश्यक पुरावा कागदपत्र, प्रमाणपत्र किंवा दाखले देखील तात्काळ या कार्यालयांस सादर करावेत.

**( डॉ.उ. दे. पाटील )**
**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,**
**जिल्हा परिषद नंदुरबार**

**प्रत- मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नंदुरबार यांना माहितीसाठी सविनय सादर.**
**प्रत- आवश्यक कार्यवाहीसाठी.**
**१. गट विकास अधिकारी, पंचायत समिति, -------------------------------- (सर्व) जि.नंदुरबार**
**२. पशुधन विकास अधिकारी (वि), पंचायत समिति, ------------------------ (सर्व) जि.नंदुरबार**
**३. नोडल अधिकारी, आय.टी.सेल, जिल्हा परिषद,नंदुरबार**

**३/-** पशुधन विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबार अंतर्गत गट स्तरावर कार्यरत सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक, व्रणोपचारक वर्ग-४ संवर्गातील कर्मचा-यांची **प्रशासकिय बदलीसाठी तात्पुरती (अंतरिम)** वास्तव सेवाजेष्ठता यादी **www.zpndbr.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत यावी ही विनंती.